# -: जाहिरात :-

**विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक**

जाहिरात क्र. 1/2016 दि.1.12.2016

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.अेपीओ-3106/प्रक्र.227/पोल-3, दिनांक 21/08/2006 अन्वये निर्माण करण्यात आलेल्या विधी अधिकाऱ्यांच्या पदांपैकी विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांचे अधिनस्त असलेल्या जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयांकरीता मंजूर करण्यात आलेल्या विधी अधिकारी गट - ब व उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयांकरीता मंजूर करण्यात आलेल्या विधी अधिकारी यांची खालील विवरणाची पदे करार तत्वावर/कंत्राटी पध्दतीने नमुद अटी व शर्तींच्या अधीन राहून तात्पूरत्या स्वरुपात भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पदनाम | विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांचे अधिनस्त असलेल्या जिल्हा पोलीस अधीक्षक व उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाकरिता भरावयाची पदे | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | नाशिक ग्रामिण | धुळे | जळगाव | अहमदनगर | नंदुरबार |
| 1 | विधी अधिकारी गट ब | 01 | 01 | 01 | 01 | 01 |
| 2 | विधी अधिकारी | 08 | 03 | 08 | 07 | 03 |

वर दिलेल्या पदसंख्येत/ नियुक्तीच्या ठिकाणात बदल होवू शकतो. त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकाऱ्यांस राहतील.

उमेदवाराने सोबत दिलेल्या विहीत नमुन्यातील अर्ज लिफाफ्यात घालून उजव्या बाजूला ठळक अक्षरात विधी अधिकारी गट - ब/ विधी अधिकारी या पदासाठी अर्ज असे नमुद करुन दिनांक 21/12/2016 रोजी पर्यंत विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, दक्षता इमारत, गडकरी चौक, नाशिक - 422002 या पत्त्यावर मुदतीच्या आत पोहेचेल अशा बेताने पाठवावेत. अर्ज कार्यालयीन वेळेत विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक या कार्यालयातही स्विकारण्यात येतील. तदनंतर प्राप्त झालेल्या व अपूर्ण/ अर्धवट विनंती अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. अर्जासोबत पत्रव्यवहाराकरीता उमेदवाराचा पत्ता असलेले दोन लिफाफे जोडावे.

## करारातील मासिक देय रक्कम

अ) विधी अधिकारी गट -ब या पदाकरिता एकत्रीत अनुज्ञेय मासिक देय रक्कम रू.15000/- आणि दुरध्वनी व प्रवास खर्चाकरिता रू.5000/-असे एकुण रू.20000/- दरमहा देय राहील या व्यतिरीक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

ब) विधी अधिकारी या पदाकरिता एकत्रीत अनुज्ञेय मासिक देय रक्कम रू.12000/- आणि दुरध्वनी व प्रवास खर्चाकरिता रू.3000/-असे एकुण रू.15000/- दरमहा देय राहील या व्यतिरीक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.